**वाचा:-**

१) शासन निर्णय क्रमांक सा.प्र.वि.एसआरव्हि /१०९५/प्र.क्र.१/९५/१२ दिनांक ८ जुन १९९५

२) शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.२९/९५/बारा, दि. २२ एप्रिल १९९६

३) शा.नि.क्र.आकृवि १२९८/प्र.क्र.६१/१५-ए, दिनांक २९ मे १९९८

४) वित्त विभाग शासननिर्णयक्रमांक वेतन ११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दिनांक- २०.७.२००१

५) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेतन /२००२/प्र.क्र.१/सेवा-३ दिंनाक- ११.१.२००२

६) कृषि व पदुम विभाग पत्रक्र आकृवि/१२०२/प्र.क्र.४७१/१५ ए, मंत्रालय मुंबई-३२, दिनांक - २ जुलै २००२

७) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दि.१ एप्रिल २०१०

८) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन-११११/प्र.क्र.८/सेवा-३,दि.१ जूलै २०११

९) सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.बीसीस-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब,दि.१८ मे २०१३.

१०) साप्रवि शा.नि.क्रमांक वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११, दि. २ जून २०१४

११) शा.नि.क्र.आप्रयो/१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३, दि.२३ डिसेंबर २०१५

१२) शासन शुध्दीपत्रक क्र.वेतन-११११/प्र.क्र.८/सेवा-३, दि.९ डिसेंबर २०१६

१३) वित्त विभाग शासन निर्णय क्र.वेतन-११११/प्र.क्र.८/सेवा-३,दि.११ मे २०१७

१४) सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३१०/कार्या-१२, दि.१५/१२/२०१७

१५) वित्त विभाग शासन निर्णय क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३,दि.०२ मार्च २०१९

१६) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२७/कोषा-प्रशा-४,दि.१४ मे २०१९

१७) मा. आयुक्त (कृषि) यांचे अध्यक्षतेखाली दि. १८/०६/२०२१ रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त जा.क्र.कृआ/आस्था-६ (कक)/सुसेआप्रयो/बैइवृ/ १९३०२/२०२१, दि. २१/०६/२०२१.

---

**विषय : सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत लाभ मंजूर करणेबाबत...**

**:: आदेश ::**

उपरोक्त अ. क्र. ३ व ६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार कृषि विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना खालीलप्रमाणे सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबतच्या योजनेअंतर्गत लाभ मंजूर करण्यात येत आहे.

**१) महाराष्ट्र कृषि सेवा गट ब (कनिष्ठ) या संवर्गातील अधिकाऱ्यांना पहिल्या लाभानंतर ८ वर्ष नियमित सेवा पुर्ण झालेनंतर दुसरा लाभ :-**

महाराष्ट्र कृषि सेवा गट ब (कनिष्ठ) या संवर्गात सन २००९ मध्ये सरळसेवेने नियुक्त झालेले अधिकारी यांना पहिल्या लाभानंतर ८ वर्ष नियमित सेवा पुर्ण झालेनंतर दुसरा लाभ महाराष्ट्र कृषि सेवा गट अ या साखळी पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी **एस-२० ५६१००-१७७५००** रकाना क्रमांक-५ मध्ये दर्शविलेल्या दिनांकापासून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | विभाग | अधिका-याचे नांव (सर्व श्री.) | पदनाम व कार्यालय | वरिष्ठ वेतनश्रेणी देय दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | कोल्हापूर | मल्ला जगन्नाथ तोडकर | तालुका कृषि अधिकारी, कवढे महांकाळ, जि. सांगली | ०१.०१.२०१६ |

उपरोक्त अधिकाऱ्यांना देण्यात आलेली साखळी पदोन्नतीची वेतन श्रेणी खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती....**

१. या योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यानंतर वेतन निश्चिती नियमीत पदोन्नती प्रमाणेच होईल. मात्र त्याच वेतनश्रेणीत नियमित/कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा वेतन निश्चितीचा लाभ देय होणार नाही.

२. उपरोक्त अधिकारी/कर्मचारी यांनी वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक पीएवाय-१०८२/सीआर-११००(एक)/एसईआर-३, दिनांक - ०६/११/१९८४ अन्वये वरिष्ठ वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीकरता हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत विकल्प द्यावा. संबंधीत कार्यालय प्रमुखांनी उपरोक्त अधिकारी/कर्मचारी यांची लाभाच्या पदाच्या वेतन

श्रेणीतील वेतन निश्चिती त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार करुन त्यांना या योजनेचा लाभ त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून देण्यात यावा.

३. जर एखाद्या अधिकारी/कर्मचारी यांना विशेष वेतन मिळत असेल तर या योजनेखाली लाभ मिळाल्यानंतर त्यास मुळ वेतनश्रेणीतील विशेष वेतन अनुज्ञेय राहणार नाही.

४. या योजनेंतर्गत लाभ मिळाला तरी अधिकारी/कर्मचारी यांचे नाव कनिष्ठ संवर्गाच्या ज्येष्ठता सूचीतच राहील.

५. या आदेशाने देण्यात आलेली साखळी पदोन्नती ही फक्त आर्थिक लाभापुरतीच मर्यादित असून नियमीत पदोन्नतीच्या पदावर हक्क सांगता येणार नाही.

६. उपरोक्त अधिकारी/कर्मचारी यांची वेतन निश्चिती करताना सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही/१०९५/प्र.क्र.१/९५/१२, दिनांक – ०८/०६/१९९५ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे बंधपत्र लिहून देणे सक्तीचे आहे. त्याप्रमाणे संबंधितांकडुन बंधपत्र प्राप्त करुन घेऊन एक प्रत सेवापुस्तकास चिटकवावी.

७. प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा नियमित पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ देय होणार नाही. या योजनेतंर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या वा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील मात्र दिलेल्या लाभांची वसूली करण्यात येणार नाही.

८. उपरोक्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबींची (मराठी/हिंदी भाषा उत्तीर्ण-सुट, विभागीय लेखा परिक्षा उत्तीर्ण-सुट, संगणक अर्हता, परिविक्षा कालावधी, स्थायी घोषित, पहिला/दुसरा लाभ देय दिनांक, विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण सद्यस्थिती, मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांचे बाबतीत जात वैधता प्रमाणपत्र) त्यांच्या मुळ सेवा पुस्तकावरुन पडताळणी करुनच पुढील वेतन निश्चिती करावी.

९. वरील निकष जे अधिकारी/कर्मचारी पुर्ण करीत नाहीत त्यांची वेतन निश्चिती न करता याबाबतचा सविस्तर अहवाल कृषि आयुकतालयास सादर करावा व वरील सर्व बाबींची पुर्तता होत नसतांनाही त्यांनी वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतन निश्चित केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कार्यालय प्रमुख जबाबदार राहतील.

१०. सदर आदेश http://krishi.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर संकेत स्थळावरील प्रत ग्राह्य धरण्यात यावी.

**स्वाक्षरीत/-**
**(धीरज कुमार)**
**आयुक्त कृषि**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**पुणे - ४११००१**
**दिनांक : २५ / ०८ /२०२२.**

---

जा.क्र.कृ.आ./आस्था-६(कक)/सुसेआप्रयो/२९२८१ /२०२२
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- ०१
दिनांक - २६ / ०८ /२०२२

प्रत, - माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

१) मा.सचिव (कृषि) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
२) मा.महालेखापाल, मुंबई/नागपूर
३) विभागीय कृषि सह संचालक,कोल्हापूर/नागपूर
४) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सांगली/वर्धा
५) संबंधित कोषागार अधिकारी / उपकोषागार अधिकारी
६) तालुका कृषि अधिकारी, कवढे महांकाळ, जि. सांगली
७) तालुका कृषि अधिकारी,आष्टी, जि.वर्धा
८) संबंधित अधिकारी
९) अभिलेख अधिकारी यांना http://www.krushi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी.

**कृषि उपसंचालक**
**कर्मचारी कल्याण कक्ष**
**कृषि आयुक्तालय, म.रा.,पुणे-०१**